# युगंधरा

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**युगंधरा**
डॉ. सुमति क्षेत्रमाडे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
डॉ. सुमति क्षेत्रमाडे

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ५५०/-

## *'युगंधरा' निमित्ताने...*

आज 'युगंधरे'चा जीवनचित्रपट वाचकांसमोर उलगडून दाखवताना तिचा वेगळा परिचय करून देण्याची तशी काही आवश्यकता नाही. तिची कथा वाचताना तिचा परिचय- नव्हे, दृढ परिचय- वाचकांना होईलच; पण माझ्या मनी-मानसी ही 'युगंधरा' कशी उमटली हे मात्र सांगावंसं वाटतं.

माझ्या इतर अनेक कथाबीजांप्रमाणे हे कथाबीजही मी माझ्या व्यवसायातून टिपलं. ते असं-

त्या दिवशी माझं दवाखान्याचं काम जरा लवकरच म्हणजे १।। लाच आटोपलं होतं, म्हणून मी खूश झाले होते. लवकर काम आटोपून दिवसभरात थोडी सवड मिळणं म्हणजे माझ्या जीवनातला दुर्मीळतेचा क्षण. विचार केला, आता या सुसंधीचा लाभ घ्यावा. लवकर बंगला गाठून झटपट जेवण उरकावं, वृत्तपत्रं, टपालपत्रं यांवरून झर्रकन नजर फिरवावी, आणि मनात घोळत असलेल्या नव्या कादंबरीची निवांत टाचणं करीत दोन तास बसावं. पाचनंतर व्हिजिटर्स, पेशंट्स पुन्हा चक्र सुरू होतं ना!

मोठ्या उत्साहानं मी झटपट आवराआवर केली नि जाण्यासाठी उठले.

तेवढ्यात माझ्या एक परिचित प्राध्यापिकाबाई आत शिरल्या.

''निघालात का? अं! आज इतक्या लवकर काम आटोपलं? खाली तुमची 'फियाट' दिसली, म्हटलं, आहात अजून- चान्स घ्यावा. तुम्हाला 'डीटेन' तर करीत नाही ना मी?''

मी पुन्हा खुर्चीत बसले, नि तोंडभर हसून (अशा प्रसंगी आपण आपल्या स्वत:च्या मनात डोकावण्याचा प्रयत्न न करणं चांगलं.) म्हटलं,

''छे छे! या ना. का बरं? काही विशेष? कुणी आजारी-सीरियस?''

''नाही. तसं आजारी कुणी नाही. पण ही माझी मैत्रीण- माझी मानलेली धाकटी बहीण- चार दिवस इथं हवापालट करायला आलीय. नुकतीच ४२ दिवसांच्या टायफॉईडमधून उठलीय. बघा ना किती अशक्त झालीय नि ॲनिमिक् दिसतेय!''

त्यांच्याबरोबर आलेल्या मुलीकडे मी नजर टाकली. सुमारे २५-२६ वर्षांची ती देखणी मुलगी दुखण्यानं बरीच कृश झालेली होती. गोरीपान असल्यामुळं ती फटफटीत दिसत होती. तिचा निस्तेज चेहरा शांत, प्रसन्न- पण काहीसा गंभीर होता.

प्राध्यापिकाबाईंनी म्हटलं, ''तुमच्या साहित्याची ही फार चाहती आहे. आल्यापासून म्हणतेय तुमची ओळख करून घ्यायची आहे. म्हटलं, चल. आताच जाऊ. दोन्ही कामं होतील. डॉक्टर, मी तिला आता पंधरा दिवस ठेवून घेणार आहे. तिला रक्तवाढीची इंजेक्शन्स– तुम्हीच बघा काय ते.''

मी तिला तपासलं. औषधं, इंजेक्शन्स लिहून दिली.

इंजेक्शन्स घ्यायला ती रोज दवाखान्यात येऊ लागली. लवकर आली तरी पेशंट्सची गर्दी संपेपर्यंत समोर बाकावर बसून राही. स्वाभाविकच परिचय वाढला. ती बी.ए., बी.एड्. होती. शाळेत शिक्षिका होती. ती अबोल होती; पण बोलण्याच्या ओघात तिच्या अंतर्मनाचा छोटासा झरोका ओझरता दिसे. माझ्या मनाचं कुतूहल जागृत होई.

अधूनमधून तिच्याबरोबर येणाऱ्या प्राध्यापिकाबाईंकडून त्या मुलीच्या कौटुंबिक कथेचे काही धागे हाती येत होते.

''डॉक्टर, ही मुलगी बी.ए. त फर्स्ट आली. बी.एड्. मध्येही पहिली आली. पहिल्यापासून ही अत्यंत हुशार. आम्हा सगळ्यांना वाटलं होतं की, ही एम्.ए. होईल. पीएच.डी. होईल. नाव गाजवील. काही करून दाखवील; पण ही चार भिंतींना चिकटून बसली. घराच्या भोवऱ्यात गरगरत राहिली. हिचे भाऊ मोठे व्यवहारी आणि धूर्त. ते आपाआपलं हित साधायला सरळ घराबाहेर पडले. त्यांनी आपाआपली बस्तानं बसवली. मुलंबाळं– त्यांचे संसार व्यवस्थित चाललेयत; पण ही घरात कुजत राहिली. हिच्यात तसा डॅशच नाही... पहिल्यापासून ही अशीच!''

आपल्या ज्येष्ठ भगिनीसमान मैत्रिणीचं हे निर्भर्त्सनेचं बोलणं ऐकून या मुलीनं फक्त किंचित स्मित केलं आणि ती इंजेक्शन घ्यायला आतल्या खोलीत गेली.

अलीकडे या मुलीचं मन थोडंसं कुठं मोकळं होऊ लागलं होतं. एक दिवस तिनं म्हटलं,

''डॉक्टर, तुम्हाला एक प्रश्न विचारू का? डॉक्टर म्हणून नव्हे, लेखिका म्हणून. माझ्या आजारीपणात तुमच्या पुस्तकांचं वाचन हा माझा मोठा विरंगुळा होता. विचारू एक?''

''विचार ना!''

''शिक्षणानं स्त्री स्वतंत्र होते का?''

त्या फिकट रुग्ण मुलीच्या प्रश्नात खोच असावी असं मला जाणवलं.

मी म्हटलं, ''शिक्षणानं स्त्री स्वावलंबी होते. स्वतंत्र होतेच असं नाही.''

एकदा तिनं विचारलं, ''तुम्ही नियती मानता?''

मी म्हटलं, ''जे आहे ते मानण्याचा प्रश्नच येत नाही.''

''माणसं म्हणजे नियतीच्या हातच्या कठपुतळ्या आहेत असं नाही का तुम्हाला वाटत?''

''खरं आहे तुझं म्हणणं.''

''डॉक्टर, स्त्रीची दुर्बलता कशात आहे असं तुम्हाला वाटतं?''

मी क्षणभर तिच्याकडे पाहात राहिले. आणि मग म्हटले, ''स्त्री आणि पुरुष असा भेद का? माणूस म्हण की.''

''बरं, माणूस म्हणते. मग सांगा ना, माणसाची दुर्बलता कशात आहे?''

''स्वत:पुरतं पाहण्यात. 'सेल्फ् सेन्टर्ड' राहण्यात.''

काही दिवसांनी आणखी एक प्रश्न–

''डॉक्टर, प्रीती हा व्यवहार आहे की भावना आहे?''

तिच्या डोळ्यांत उत्कंठा होती. स्वरात आर्तता होती.

मी विचारलं, ''पाणी हा बर्फ आहे की वाफ आहे?''

ती हसली. नुकत्याच झालेल्या गप्पांचा भावार्थ लक्षात घेऊन थोडी संकोचली. तिनं म्हटलं,

''समजलं काय ते. खरं प्रेम म्हणजे काय याचा मी सतत विचार करते आहे; पण त्याचा काही शोध लागत नाही. अर्थ कुठं सापडत नव्हता.''

मी हसले. म्हटलं,

''नाहीच सापडणार.''

''का?''

''कस्तुरीचा शोध कस्तुरीमृगाला कधी लागतो का? त्याला ती सापडते का?''

ती हसली. तिचे डोळे एकदम भरून आले.

असे तिचे कितीतरी प्रश्न असत. त्या अबोल मुलीचं बोलणं म्हणजे जवळ जवळ प्रश्नावलीच असे; पण त्या प्रश्नांतून तिचं अंतरंग दिसे.

पंधरा दिवसांनी ती गेली. छे! गेली कुठची! माझ्या नजरेसमोरून ती हलत नव्हती. ती शांत, अबोल मुलगी माझ्या मनात एका बाजूला बसून राहिली होती. दवाखान्यात इंजेक्शनसाठी बसून राही तशी. काही व्यक्तीच अशा असतात की त्या (का कोण जाणे!) आपल्या मनात घुसून बसतात. बाजूला करू म्हटलं करता येत नाहीत.

तिचे अनेक प्रश्न माझ्या मनात घोळत राहिले. तिच्या अंतरंगाचा जेवढा भाग दिसला तेवढाच नजरेसमोर तरळत राहिला. अर्थात अंतरंगाचा जो भाग दिसला तो अगदी बिंदुमात्र होता; पण तो पानावर पडलेल्या दवबिंदूसारखा होता. दवबिंदूत सभोवरच्या सृष्टीचं चिमुकलं सीमित प्रतिबिंब उमटतं; पण त्यावरून कल्पक मनाला अफाट सृष्टीची कल्पना सहज होऊ शकते. माझ्या मनात कल्पनातरंग उठत होते.

मध्यंतरी सहा महिने गेले. एक दिवस अचानक रस्त्यात प्राध्यापिकाबाई भेटल्या.

मी पहिला प्रश्न केला–

''आमचा पेशंट कसा आहे? तुमची ती मानलेली धाकटी बहीण?''

''घरी चल सांगते.''

मी एकदम त्यांच्या गंभीर चेहऱ्याकडे पाहिलं. सारं समजून चुकले. मूकपणे त्यांच्याबरोबर घरी गेले.

घरी पोहोचताच त्यांचा उमाळा बाहेर पडला. त्या उमाळ्यातून त्या मुलीच्या जीवनकथेचे आणखी काही धागे हाती आले. त्या हुशार मुलीच्या दुर्बलतेबद्दल सद्गदित होऊन त्या पुन:पुन्हा हळहळ व्यक्त करीत होत्या.

अस्वस्थ मनानं मी घरी आले. विचारांना चालना मिळाली. तिच्या दुर्बलतेतच तिची असामान्य शक्ती मला दिसू लागली.

तिची जातच वेगळी. झाडांच्या जातीसारख्या माणसांच्याही जाती असतात. चंदनाची जात, बाभळीची जात– एकाची वृत्ती, त्याचे गुणधर्म दुसऱ्याला कसे येतील? चंदनाचं साल बाभळीला चिकटेल का?

माझ्या मनातलं कथाबीज फुलू लागलं. दवबिंदूतल्या प्रतिबिंबाच्या कक्षा वाढू लागल्या. 'युगंधरा' आकार घेऊ लागली. बिंदूला सिंधूचं रूप येऊ लागलं. वेगळ्या स्वभावाची, आगळ्या जाती– प्रकृतीची, संस्कारांची पाळंमुळं खोलवर रुजलेली ही मुलगी दुर्बल असून माझ्या लेखी दुर्बलतेच्या व्याख्येत न बसणारी– न सामावणारी. भावुकतेपायी व्यवहारशून्यता पदरी घेऊन इतरांचा व्यवहार सांभाळणारी, प्रीतीला भक्तीचं रूप आणि मानसपूजेची महती देणारी. तिच्या भाव–भावनांची रूपंच अनेकविध. तिच्या जीवनातले संघर्षही बहुविध.

'युगंधरा' आकार घेऊ लागताच तिच्या अनुषंगानं तिच्या चित्रणाला पोषक अशी इतर पात्रं निर्माण केली. ही पात्रं आपापली स्वभाववैशिष्ट्यं घेऊन युगंधरेच्या अवतीभोवती वावरू लागली. या सगळ्या व्यक्ती संपूर्णपणे काल्पनिक आहेत. आणि 'युगंधरा'सुद्धा सत्याचा केवळ एक बिंदू. बाकी सगळा सिंधू काल्पनिक.

अशी ही आगळी–वेगळी भावकथा आज प्रकाशित होत आहे. माझ्या आजवरच्या अन्य कादंबऱ्यांप्रमाणे हिचंही स्वागत व्हावं.

दि. ११–९–१९७४ **– सुमति क्षेत्रमाडे**

✦✦✦

# ऋणनिर्देश

आज 'युगंधरा' कादंबरीची दुसरी आवृत्ती प्रकाशित होत आहे.

'युगंधरा'चा पहिल्या आवृत्तीत परिचय करून दिलेला आहेच. पार्श्वभूमीही सांगितली आहे. तेव्हा आता परिचयादाखल आणखी काही लिहिण्याचं शिल्लक राहिलेलं नाही.

पण 'युगंधरा'ला जे अमाप यश लाभलं आणि माझ्या रसिक वाचकांनी तिचं जे स्वागत केलं त्याचा कृतज्ञतेनं ऋणनिर्देश करण्यासाठी चार शब्द लिहीत आहे.

गेल्या दोन वर्षांत 'युगंधरा'चं कौतुक करणारी असंख्य पत्रं मला आली. अजूनही येत आहेत. घरात चिकटलेली 'युगा' चारही दिशांना पोहोचली. उत्तर प्रदेश, आसाम, काश्मीर, मद्रास, गुजरात– सगळीकडे जाऊन आली. ती जिथं जिथं गेली तिथं तिथं उत्स्फूर्त आणि अंतरीच्या उमाळ्यानं स्वागत झालं.

एक–दोन ठिकाणी स्वागत जरा कडक झालं. स्वागतकर्तीनं ओठ मुरडून म्हटलं,

''युगा, मी स्पष्टवक्ती (की फटकळ?) आहे. माझ्या मते तू तुझी बुद्धी, तुझं रूप– तुझं सगळं आयुष्यच तू फुकट घालवलंस. घराला चिकटून न राहता घराबाहेर पडली असतीस तर स्वत:चा केवढा उत्कर्ष साधला असतास! नावलौकिक मिळवला असतास. समाजसेवा केली असतीस. स्वतंत्र जीवन जगली असतीस. सगळं मातीमोल करून टाकलंस. आणि...''

या इलेक्ट्रिक फटाक्यांनी युगा गोंधळली. फटाके विझले तसे तिने मृदू आवाजात हलकेच म्हटलं,

''खरं आहे. मी स्वयंकेंद्रित बनून, स्वत:च्या उज्ज्वल भविष्यावर नजर रोखून, घरच्या सगळ्या अडचणींकडे पाठ फिरवून घराबाहेर पडले असते, खूप शिकले असते, तर माझ्याभोवती कीर्तीचं वलय निर्माण झालं असतं अन् वैभवाचं कोंदण मिळालं असतं; पण माझ्या मनाला आतून पोखरण लागली असती. सार्थकतेचं समाधान मला मिळालं नसतं. प्रत्येकाच्या समाधानाच्या जागा वेगळ्या असतात. भावनेकडे पाठ फिरवणं मला जमत नाही. तुमच्या लेखी मी दुर्बळ आहे. माझ्या प्रकृतीची जात वेगळी आहे. फुलांच्या, वृक्षांच्या जाती असतात, तशा स्त्री–पुरुषांच्याही जाती असतात. एकाच मोल–मापानं जिथं धान्य मोजता येत नाही, तिथं माणसं कशी मोजता येतील?

प्राप्त परिस्थितीत माझ्या अल्प अन् माझ्या जन्मजात प्रवृत्तीनुसार मी वागले. घराच्या भावनिक भिंती सावरून धरल्या. घर टिकवून धरलं. याला काहीच का किंमत नाही?

पण अपवादादाखल अशी एक-दोन उदाहरणं सोडली तर 'युगंधरा'चं अमाप कौतुक झालं. ती सगळ्यांना प्रिय झाली. त्यांनी तिच्या स्वभावाच्या, गुणांच्या अनेक पैलूंची मनमुक्त प्रशंसा केली.

एका रसिक कवयित्री भगिनीनं तर हर्षोत्फुल्ल होऊन म्हटलं-

''तुला पाहिलं की असं वाटतं,-

*तू तर बकुळकळी सुहास्यवदना मितभाषिणी श्यामला।*
*शोभे लोभस भाव, सात्त्विक मुखी हा जीव की गुंतला।।*
*तू शुचिता, शुभदा, सखे सरलता साक्षात, न शंका मला।*
*तू मधुरा, विनया, सुजाण मृदुला गंगेहुनी निर्मला।।*

(कवयित्री- सौ. विनीता आंबेडकर)

या सगळ्या रसिक वाचकांची मी अत्यंत ऋणी आहे. माझ्या वाचकांनी मला असंच नित्य ऋणात ठेवावं. कारण वाचक ही माझी मोठी प्रेरक शक्ती आहे. ही शक्ती माझ्या पाठीशी नसेल तर मी जे अल्प लेखन करते तेही दुबळं पडेल. इति।

कोल्हापूर.
२४-११-१९७६

**- सुमति क्षेत्रमाडे**

✦✦✦

आज 'युगंधरा'ची तिसरी आवृत्ती निघत आहे, त्यानिमित्त आपली पुनर्भेट होण्याचा सुयोग प्राप्त होत आहे.

तसं पाहिलं तर माझ्या वाचकांना 'युगा'चा प्रथम परिचय झाला, त्याला आता अकरा वर्षे- जवळजवळ एक तप झालं; पण तिच्यावरचा वाचकांचा लोभ अजून टिकून राहिला आहे याचे प्रत्यंतर वाचकांच्या अधूनमधून येणाऱ्या पत्रांवरून दिसून येते.

माझ्या सगळ्याच कादंबऱ्या तशा वाचकप्रिय झाल्या आहेत. कुठच्याही कथा-कादंबरीची 'प्रियता' ही वाचकांच्या विचारदृष्टीवर आणि त्यांच्या भाव-सृष्टीवर अवलंबून असते.

तरीपण 'युगा'च्या बाबतीत वाचकांच्या- विशेषत: स्त्री वाचकांच्या पत्रांची संखा अधिक भरते आहे. अधूनमधून पत्रे येतच असतात.

दोन महिन्यांपूर्वीच आलेल्या पत्रात एका भगिनीने लिहिले आहे-

...''तुमची 'युगंधरा' मी माझ्या संग्रहीच ठेवली आहे. 'युगा' माझी जिवलग सखी बनली आहे. या कादंबरीची बहुतेक प्रकरणे मला पाठ झाली आहेत. विशेषत: पाच-सहा प्रकरणांतील प्रसंग आणि शेवटचा प्रसंग तर माझ्या मनाला कायमचा खिळून बसला आहे.''...

तिचे पत्र वाचताना या कादंबरीच्या 'प्रियते'चं कारण मला अचानक सापडलं.

त्या प्रकरणापासून शेवटपर्यंत युगाच्या मनाची जी वेदना पानोपानी भरून राहिली आहे, ती वेदना अंतरीचा ठाव घेणारी आहे. ही वेदना वेगळ्या जातीची आहे.

तिने केलेल्या त्यागाचे, असफल प्रीतीचे तिला किमपिही दु:ख नाही... ते दु:ख तिनं हसतमुखानं पचवलं आहे.

वेदना आणि दु:ख- या भावना मूलत: एक. तरी त्या संपूर्ण भिन्न आहेत.

वेदनेचं सामर्थ्य कमी झालं की त्याचं रूपांतर दु:खात होतं. युगाच्या वेदनेचं सामर्थ्य! हे सामर्थ्य!

तिने आपली विचारदृष्टी आणि भावसृष्टीविषयी दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत स्वमुखाने सारे काही सांगितले आहे.

नियती प्रत्येक व्यक्तीच्या पुढे एक पाऊल चालत असते. या नियतीची रूपेही विविध! युगाच्या जीवनात ती कुणाच्या रूपाने उभी होती हे सांगण्याची आवश्यकता नाही, असो.

'युगा' पुन्हा आपणा सर्वांच्या भेटीला येत आहे. आपला तिच्यावर नित्य असाच लोभ राहावा.

इति।

कोल्हापूर.

दि. १ जानेवारी ८६ **– सुमति क्षेत्रमाडे**

✦✦✦